# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 May 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ मे २०२५ दुपारी १.०० वा.

****

जम्मू काश्मीरच्या शोपिया जिल्ह्यात सुरक्षा दलाच्या जवानांनी तीन अतिरेक्यांना आज सकाळी कंठस्नान घातले. शोपिया जिल्ह्याच्या शुक्रू केलर जंगलात अतिरेकी लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलाच्या जवानांनी या परिसराला घेराव घातला. सुरक्षा दल तेथे पोहोचताच अतिरेक्यांनी बेछूट गोळीबार सुरू केला. प्रत्यूत्तरात सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात तीन अतिरेकी ठार झाले.

****

देशाच्या बहादूर जवानांची भेट घेणं ही माझ्यासाठी विशेष बाब आहे. वायूदलाच्या जवानांचा देश नेहमीच ऋणी राहील, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. पंजाबमधील आदमपूर हवाई तळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी भारतीय जवानांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. जवानांशी चर्चा करून पंतप्रधानांनी त्यांचा उत्साह वाढवला.

****

भारत–पाकिस्तानमधील सद्यस्थितीवर चर्चा करण्यासाठी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज सकाळी संरक्षण दलाच्या तीनही प्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीस संरक्षण सचिव देखील उपस्थित होते. दरम्यान, दोन्ही देशांच्या डीजीएमोंची बैठक सायंकाळी होण्याची शक्यता आहे.

****

भारत–पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर जम्मू–काश्मीरमधील परिस्थिती आता पूर्ववत होत आहे. सीमावर्ती भाग वगळता जम्मू–काश्मीरमधील इतर शाळा आज सुरू झाल्या आहेत.

****

अमृतसरच्या मजिठा इथं विषारी दारू प्राशन केल्यामुळे १४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना आज घडली आहे. सहा जणांना रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकणातील मुख्य पुरवठादार परमजीत सिंग याच्यासह चार आरोपींना अटक झाली आहे.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं दहावी परीक्षेचा निकाल जाहीर केला. निकालामध्ये यंदाही मुलींनीच बाजी मारली असल्याचं मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून १५ लाख ४६ हजार ५७९ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांची टक्केवारी ९४ पूर्णांक १० इतकी आहे. यात पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ८१ टक्के , नागपूर - ९० पूर्णांक ७८, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक ८२ टक्के, मुंबई ९५ पूर्णांक ८४, कोल्हापूर - ९६ पूर्णांक़ ७८, अमरावती - ९२ पूर्णांक ९५, नाशिक - ९३ पूर्णांक ०४ टक्के, लातूर - ९२ पूर्णांक ७७ तर कोकण विभागाचा निकाल ९९ पूर्णांक ८२ टक्के इतका लागला आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसीईच्या १२ परीक्षांचा निकाल आज जाहीर करण्यात आला. १६ लाख ९२ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. या परीक्षेत ८८ पूर्णांक ३९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सीबीएसईच्या निकालातही मुलींनी बाजी मारली आहे. www.cbse.gov.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना आपला निकाल पाहता येणार आहे.

****

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे निर्देश मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. बावनकुळे यांनी नागपूर इथून आज दूरदृष्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नसून ॲग्रीस्टॅक नोंदणी नसणाऱ्या शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं.

****

कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर आणि ॲम्युचअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचा बक्षिस समारंभ वर्धा इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज पार पडला. या स्पर्धेत देशभरातील एकूण २७ पुरुष संघ आणि २२ महिला संघ सहभागी झाले होते. जम्मू काश्मीर, लडाख या भागातील स्पर्धकांचाही यात समावेश होता.

****

दरम्यान मुख्यमंत्र्यांनी वर्धा इथल्या सावरकर स्मारक उद्यानास भेट देऊन त्यांच्या पुतळ्यास अभिवादन केलं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी स्वातंत्र्याच्या लढ्याला एक वेगळी कलाटणी दिली. त्यांची विज्ञाननिष्ठता नवीन पिढीमध्ये रुजवता आली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न सर्वांनी एकत्रिपणे करणं गरजेचं असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वर्धा इथं सेवा पंधरवड्याचा समारोप तसंच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय इमारतींचं लोकार्पणही आज करण्यात आलं.

****

मुंबईत आज सकाळपासूनच अवकाळी पावसाला सुरुवात झाली असून शहर आणि उपनगरात ढगाळ वातावरण निर्माण झालं आहे. मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरात सकाळी नऊ वाजेपासून जोरदार सरी कोसळत आहेत.

****